# महाराष्ट्र शासन

<u>अतिमहत्वाचे</u>

**क्रमांकः इमाव - २०१३/ प्र.क्र.१/ विजाभज-१**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांकः ०२२-२२७९ ३० २४
फॅक्स क्रमांकः ०२२-२२८३ ६६ ८८
दिनांक : २२ जानेवारी, २०१३.

**प्रति,**
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल)
सर्व तहसिलदार

दिनांक 27 FEB 2013
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
विभाग
ना. अ. (म.)
सह. / प्र.लि.
उ.जि. (सा)
नि. उ.जि.
अप्पर जिल्हाधिकारी
आ.क्र.

**विषय:** इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवाराचे आई / वडील या पैकी एक किंवा दोघेही शासकीय (केंद्र किंवा राज्य शासनातील सेवेत) सेवेत असतील तर अशा व्यक्तिंना आरक्षणाचे फायदे मिळण्याकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ति / गट (क्रिमिलेअर) मध्ये मोडत नसल्याचे **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** देणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी विविध अर्जदार तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मार्गदर्शनासाठी शासनाकडे वारंवार करण्यात येणाऱ्या विनंतीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सविस्तर खुलासा करण्यात येत आहे. :-

इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तिंना आरक्षणाचे फायदे देण्यासाठी त्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति / गट यांना वगळण्याबाबत भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रीव्हन्सेस अॅन्ड पेंशन, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग, नवी दिल्ली यांच्या **दिनांक ८ सप्टेंबर, १९९३, दिनांक १४ ऑक्टोंबर, २००४ व दिनांक १४ ऑक्टोंबर, २००८** च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे निर्गमित केलेल्या निकषांनुसार -

**(अ) एखाद्या उमेदवाराचे आई / वडील या पैकी एक किंवा दोघेही शासकीय (केंद्र किंवा राज्य शासनातील सेवेत) सेवेत असतील आणि त्यांच्या शासकीय सेवेतील <u>पदांचा दर्जा</u> (गट अ/ ब/ क/ ड) निश्चित झाला असेल तर सदर उमेदवाराचा उन्नत / प्रगत गट (क्रिमिलेअर) दर्जा हा त्याच्या स्वतःच्या स्तरानुसार किंवा उत्पन्नानुसार किंवा त्याच्या पतीच्या / पत्नीच्या स्तरानुसार किंवा उत्पन्नानुसार निश्चित न करता त्याचा किंवा तिचा उन्नत / प्रगत गट (क्रिमिलेअर) हा केवळ त्याच्या किंवा तिच्या आई किंवा वडिल / दोघांच्या <u>शासकीय सेवेतील स्तराच्या / दर्जाच्या (ACCORDING TO THE STATUS / CLASS OF THE PARENT/S IN THE GOVERNMENT SERVICE)</u> आधारे विहित नियमानुसार निश्चित केला जाईल.**

WS - 250
02/03/13

(ब) (i) उपरोक्त निर्धारण करतांना उमेदवाराच्या आई / वडील किंवा दोघांचेही वेतनापासून मिळणारे उत्पन्न तसेच शेत जमिनीपासून होणारे उत्पन्न गृहित धरले जाणार नाही.

(ii) तथापि, सदर निर्धारण करतांना उमेदवाराच्या आई / वडील किंवा दोघांचेही इतर मार्गाने (वेतनापासून होणारे उत्पन्न व शेत जमीनीपासून होणारे उत्पन्न वगळून) होणारे उत्पन्न जर रू. ४.५० लाखापेक्षा जास्त असेल तरच, वर्गवारी क्र. VI अनुसार उत्पन्न / मालमत्तेचा निकष लागू होईल.

(iii) इतर मार्गाने होणारे उत्पन्न हे देखील मागिल तीन वर्षातील प्रती वर्षी होणाऱ्या उत्पन्नावर आधारीत राहिल. तथापि, सदर उत्पन्नाचे निर्धारण करतांना मागिल तिन्ही वर्षाच्या उत्पन्नाचे एकत्रिकरण करुन त्याची प्रती वर्षाची सरासरी काढण्यात येणार नाही.

(क) "ज्या मुला/ मुलींचे आई, वडील किंवा दोघेही हे सरळसेवेद्वारे नियुक्त वर्ग-३ किंवा वर्ग -४ श्रेणीतील कर्मचारी असून ते वयाच्या ४० व्या वर्षी किंवा त्या अगोदर वर्ग-१ श्रेणीमध्ये अधिकारी झाले असले तरी त्यांच्या मुला-मुलींची गणना उन्नत व प्रगत गटामध्ये (क्रिमिलेअर) केली जाणार नाही. "

२. तथापि, संबंधित अर्जदारास उन्नत व प्रगत गटामध्ये (क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र देताना भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रीव्हन्सेस अॅन्ड पेंशन, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग, नवी दिल्ली यांच्या दिनांक ८/९/१९९३ व दिनांक १४/१०/२००४ च्या कार्यालयीन ज्ञापनामधील तरतूदींनुसार त्या अर्जदारांच्या आई/वडीलांचे किंवा दोघांचेही मागिल सलग तीन वर्षांचे इतर मार्गाने होणारे उत्पन्न (वेतनापासून होणारे उत्पन्न व शेत जमिनीपासून होणारे उत्पन्न वगळून ) हे रु. ४.५० लाख प्रतीवर्षी या पेक्षा (किंवा शासनाने या संदर्भात वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा) कमी असणे आवश्यक आहे.

(मो. बा. ताशिलदार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

-------